3735

जाक्र.जिप.ग्रापापुवि.आस्था.कावि. 3735 /2023
ग्रामिण पाणी पुरवठा विभाग ,जिल्हा परिषद परभणी
दिनांक :-21 /03/2023

प्रति ,

मा.जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय परभणी

विषय :- संकेत स्थळावर जाहीरात प्रसिध्द करणे बाबत

संदर्भ :- सा.प्र.वि. शा.नि.क्र.संकीर्ण.2715/प्रक्र100/13 दिनांक 17/12/16

उपरोक्त विषयी संदर्भीय शासन निर्णयानुसार ग्रामिण पाणी पुरवठा विभाग ,जिल्हा परिषद परभणी अंतर्गत गट ब ( राजपत्रीत व अराजपत्रीत ) या संवर्गीय सेवेमधुन सेवा निवृत्त अधिकारी यांचेतुन करार पध्दतीने पदे भरावयाची आहेत.

तरी सदर पद भरण्यासाठीची जाहीरात आपल्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी ही विनंती.

सोबत :- जाहीरात

( रश्मी खांडेकर )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद परभणी

प्रतिलिपी :-
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. ) जिल्हा परिषद परभणी ( I.T.Cell ) यांना देवुन कळविण्यात येते की सोबत जोडण्यात आलेली जाहीरात जिल्हा परिषद परभणीच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

स्वा/-
( रश्मी खांडेकर )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद परभणी

## जाहीरात

ग्रामिण पाणी पुरवठा विभाग ,जिल्हा परिषद परभणी

**सेवा निवृत्त शासकीय / निमशासकीय गट -ब ( राजपत्रित व अराजपत्रित ) अधिका-यामधुन करार पध्दतीने भरावयाचे पदासाठी जाहीरात**

शासन निर्णय सा.प्र.वि.क्रमांक.संकीर्ण.2715/प्र.क्र.100/13 दिनांक 17 डिसेंबर 2016 मधील मार्गदर्शक सुचंनेनुसार ग्रामिण पाणी पुरवठा विभाग ,जिल्हा परिषद परभणी अंतर्गत जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत घेतल्या जाणा-या पाणी पुरवठा योजनांच्या कामांचे सनियंत्रण करण्यासाठी सेवा निवृत्त शासकीय / निमशासकीय अधिका-यामधुन करार पध्दतीने कनिष्ठ अभियंता स्था. ही पदे भरण्यासाठी जाहीरात देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणीक पात्रता | कामाचे स्वरुप | देय मासिक परिश्रमीक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शाखा अभियंता स्था. (करार पध्दतीने) | 05 | DCE/B.E.(Civil) व उच्च शैक्षणीक अर्हता Experience : Min 5 Year Candidate should withdraw 60% Salary amount in previous job which has quoted in advt. | जल जीवन मिशन कार्यकमांतर्गत घेतल्या जाणा-या पाणी पुरवठा योजनांचे कामाचे सनियंत्रण | शासन निर्णय सा.प्र.वि.क्रमांक.संकीर्ण.2715/प्र.क्र.100/13 दिनांक 17 डिसेंबर 2016 मधील ड (1) (क) नुसार अनुज्ञेय राहील. |

ईच्छुक उमेदवारांनी जाहीरातीत नमुद संपुर्ण माहिती काळजीपुर्वक वाचन करुन पदा नुसार आवेदन अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह ग्रामिण पाणी पुरवठा विभाग ,जिल्हा परिषद परभणी ( जिल्हा परिषद नविन प्रशासकीय ईमारत तिसरा मजला ) येथे पाठविण्यात यावे.जाहीरातीचे अनुषंगाने ऑनलाईन पध्दतीने कोणतेही अर्ज स्वीकृत करण्यात येणार नाहीत.

(10 एप्रिल 2023)

अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक

1. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक :- 24 /03/2023 ते दिनांक 10 /04/2023 रोजी सायंकाळी 5-00 वाजे पर्यंत राहील. सदर पदासाठी **सेवा निवृत्त शासकीय / निमशासकीय गट -ब ( राजपत्रित व अराजपत्रित )अधिकारी हेच अर्ज सादर करु शकतील.**
2. दिनांक :- /03/2023 रोजी सायंकाळी 5-00 वाजे पर्यंत पोस्ट अथवा ईतर माध्यमातुन आलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. त्यानंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. पोस्ट अथवा इतर माध्यमातुन आलेले अर्ज विलंबाने प्राप्त झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.
3. प्राप्त अर्जाचे छाननीनंतर संबधीत पात्र उमेदवारांना 1: 3 ( एका पदासाठी तिन ) या प्रमाणे मुलाखतीस बोलविण्यात येईल. व पात्र / अपात्र उमेदवारांची नावांची यादी मा.जिल्हाधिकारी परभणी व जिल्हा परिषद परभणी च्या संकेत स्थळावर दर्शविण्यात येईल. या कार्यालया मार्फत वैयक्तीक रित्या कळविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
4. सदर पदासाठी निवड प्रक्रीया , वयोमर्यादा , मासिक परिश्रमिक / मानधन ,अटी व शर्ती तसेच पदाची कर्तव्य जबाबदा-या ई. बाबतचा तपशील सोबतच्या परिशिष्ट अ मध्ये नमुद करण्यात येत आहे.
5. मुलाखतीस येण्या-जाण्यासाठी येणारा खर्च उमेदवारास स्वत: करावा लागेल.
6. सदर पद भरती प्रक्रीयेमध्ये बदल करण्याचा अथवा रदद करण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद परभणी यांचेकडे राखीव ठेवण्यात येत आहे.

( डि.ए.घुगे )
कार्यकारी अभियंता
ग्रामिण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद परभणी

( रश्मी खांडेकर )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद परभणी

## परिशिष्ट अ

**जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सेवा निवृत्त शासकीय / निमशासकीय गट ब ( राजपत्रित व अराजपत्रित ) अधिका-यामधुन करार पध्दतीने पदभरती अनुषंगीक अटी व शर्ती**

1. जाहीरातीमध्ये नमुद पदनामामसोर नमुद संवर्गातुन अधिकारी सेवा निवृत्त असणे आवश्यक आहे.
2. सदर पद भरती प्रक्रीया ही शासन निर्णय सा.प्र.वि.क्रमांक.संकीर्ण.2715/प्र.क्र.100/13 दिनांक 17 डिसेंबर 2016 मधील मार्गदशक सुचनांनुसार करण्यात येईल.
3. सदर पदांकरीता मासिक परिश्रमिक / मानधन शासन निर्णय सा.प्र.वि.क्रमांक.संकीर्ण.2715/ प्र.क्र.100/13 दिनांक 17 डिसेंबर 2016 मधील नमुद परिशिष्ट अ नुसार परिगणना करुन निश्चीत करण्यात येईल.
4. सदर पदांसाठी वेळे-वेळी निर्गमित शासन निर्णय/परिपत्रक/शासन आदेशातील अटी व शर्ती लागु राहतील.
5. सदर पदासाठी वर्यामर्यादा ही 64 वर्ष राहील.
6. सदर पदाचा कालावधी प्रथमत: 1 वर्षासाठी घेण्यात येईल. तथापी सदर कालावधी कमी किंवा मुदतवाढ देण्या बाबत सर्वस्वी अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद परभणी यांना राहतील.
7. प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन मुलाखतीस पात्र ठरलेल्या अर्जदाराची यादी जिल्हाधिकारी कार्यालय परभणी व जिल्हा परिषद परभणीचे संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.उमेदवारांना कोणत्याही सुचना थेट पत्रव्यवहार अथवा ईमेल व्दारे कळविण्यात येणार नाही.
8. करार पध्दतीने नियुक्त केलेल्या पदांच्या सर्व नेमणुका करार संपल्यानंतर संपुष्ठात येतील.करार पध्दतीने नियुक्त अधिकारी यांना शासकीय कर्मचारी म्हणुन गणले जाणार नाही.
9. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षीत काम पुर्ण करण्याची जबाबदारी संबधीत व्यक्तीची राहील. या आशयाचे बंधपत्र/ हमीपत्र दयावे लागेल. शासन निर्णय दि.17/12/16 मध्ये विहीत केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्या बाबत , तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्क्तीकडुन नियमीत सेवेत घेण्या बाबतचा अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही असा उल्लेख असे आवश्यक राहील.
10. सदर पदासाठी अर्ज करतांना स्वत:चा बायोडाटा ,शैक्षणीक पात्रता कागदपत्र व सेवा निवृत्ती आदेश व ईतर अनुषंगीक कागदपत्राची छायांकीत प्रत सोबत जोडले आवश्यक राहील.